# Interdisciplinary International Conference contemporary Issues & Challenges in Social Sciences & Languages

**22nd Sept.2018**

## Organizer

**Department of Political Science,**

**Shri Sahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur**

## Special Issue published By

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**ISSN 2349-638x**

**Peer Review and Indexed Journal**

**Impact Factor 4.574**

**Website www.aiirjournal.com**

**Email :- aiirjpramod@gmail.com**

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 236 | डॉ.सुरेश एम.चव्हाण | ऐतिहासिक संशोधनातील आव्हाने | 867 To 869 |
| 237 | तानाजी माने | भारताचे परराष्ट्र धोरण(काल, आज आणि उद्या) | 870 To 874 |
| 238 | उदयकुमार लाड | भारतातील धर्मनिरपेक्ष व समान नागरी कायदया संदर्भाची चिकीत्सा | 875 To 877 |
| 239 | श्रीमती उज्वला उत्तम संकपाळ डॉ. श्रीमती रूपाली उत्तम संकपाळ | भाषा अध्यापनातील सामाजिक, राजकीय आणि वैयक्तीक वादग्रस्त मुद्दे | 878 To 881 |
| 240 | डॉ. वसंत भूपाल शिंदे | अलिप्ततवादी चळवळ : सातत्य, स्थित्यंतर आणि प्रस्तुतता | 882 To 888 |
| 241 | कमलाकर एन राक्षसे | भारतातील जात आणि राजकारण | 889 To 891 |
| 242 | तटाळे पद्माकर बळीरा | जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम | 892 To 894 |
| 243 | डॉ. राक्षसे सिद्धार्थ गुणाजी | सायबर दहशतवाद | 895 To 897 |
| 244 | डी.आर. पाटील | महाराणी येसूबाइ यांचे कार्य कतृत्व | 898 To 899 |
| 245 | Mr.Kuldeep D. Ghorapade | Contemporary Issues and Challenges in Higher Education in India | 900 To 903 |
| 246 | Miss. Manisha Madhukar Kurane | India Towards Green Politics And Envormental Climate Change | 904 To 908 |
| 247 | Dr. Mrs. N. D. Kashid-Patil | Study of Trends of Urbanization in Ratnagiri District | 909 To 913 |
| 248 | Dr. Vijay Annaso Mane | Challenges of Social Entrepreneurship | 914 To 917 |
| 249 | Prof. B. S. Mangate | Role Of Agriculture In Indian Economy | 918 To 922 |
| 250 | Mr. Sopan D. Jadhavi | Role Of Judiciary Vis-A-Vis Freedom Of Press - An Analytical Study | 923 To 926 |
| 251 | श्री. अजितकुमार भिमराव पाटील | राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन जाणीवेचा अभ्यास | 927 To 932 |
| 252 | अनंतराव जुलालराव पवार | आधुनिक कल्याणकारी राज्यात अर्थसंकल्पाची भुमिका | 933 To 935 |
| 253 | डॉ. अनिल रा. कडू | निवडणुक आयोगाची भूमिका | 936 To 940 |
| 254 | अंकुश रा. बनसोडे | सद्य:स्थितीतील भारतीय शिक्षक प्रशिक्षणाची वाटचाल आव्हानातून गुणवत्तेकडे | 941 To 944 |
| 255 | गणपत विठ्ठल पाथरवट प्रा.माधव मा. भोसले | 1980 नंतरच्या महानगरीय कादंबरीतील समाजचित्रण | 945 To 947 |
| 256 | जयसिंग मारूती कांबळे | 'अस्तित्व के लिए छटपटाता तिब्बत – तरूण भटनागर की कहानी 'भूगोल के दरवाजे पर' के विशेष संदर्भ में' | 948 To 951 |

# भारताचे परराष्ट्र धोरण
# (काल, आज आणि उदद्या)

**प्रा. तानाजी माने**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
लोकमान्य महाविद्यालय,
वरोरा जि. चंद्रपूर

**प्रस्तावना :-**

भारतीय परराष्ट्र धोरणाची मुलभूत तत्वांचा विकास हा स्वातंत्र्य आंदोलनात झाली. इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेबरोबरच परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यासंबंधी भारतीयांनी आपली मते व्यक्त करण्यास सुरूवात केली. स्वातंत्र्यपूर्व काळातील इ.स. १९२७ ते १९४७ आणि स्वातंत्र्योत्तर काळातील १९६४ पर्यंत भारताचा परराष्ट्र विभाग हा पं. नेहरूच्या नेतृत्वाखाली होता. या दरम्यानच्या काळात भारतीय परराष्ट्रीय धोरणाचा पाया घालण्याचे महत्वाचे कार्य पं. नेहरूंनी केले. पं. नेहरूनंतर श्रीमती इंदिरा गांधी यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला यथार्थवादाचा नवीन आयाम दिला. इ. स. १९७१ साली सोव्हियत रशियाशी मैत्री व सहयोगासाठी करण्यात आलेला करार हा त्याचाच एक भाग होता. इ.स. १९९०–९१ रशियाचे पतन झाले. शीतयुद्धोत्तर काळात नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला जोडून घेण्यासाठी सत्तेवर आलेला शासकांनी भारताच्या परराष्ट्र धोरणात काही नवीन तत्वांची भर घातली त्यात पी. व्ही. नरसिंहराव यांनी 'लूक ईस्ट' चे धोरण स्विकारले. तर इंद्रकुमार गुजराल यांनी 'गुजराल सिद्धांत' च्या आधारे शेजारील देशाशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी 'पी ५' या संकल्पनेच्या आधारे विकसित राष्ट्रांसोबतचे संबंध प्रस्थापित करण्याला प्राधान्य दिले. एकंदरीत प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या परराष्ट्र धोरणांतील 'सातत्य आणि स्थित्यंतर' अभ्यासण्याबरोबरच भारतीय परराष्ट्र धोरणांसमोरील संभाव्य आव्हानांचाही अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**परराष्ट्र धोरणाचा अर्थ :-**

परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्रहित साध्य करण्यासाठी एखादद्या राष्ट्रांकडून दुसऱ्या राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्याची प्रक्रिया होय. प्रा. महेंद्रकुमार यांनी परराष्ट्र धोरणाची व्याख्या ही राष्ट्रीय हिताच्या अनुषंगाने केली आहे. त्यांच्यामते, ''प्रत्येक राज्याचा व्यवहार इतर राज्याच्या व्यवहाराला प्रभावित करीत असतो. आपल्या राष्ट्रीय हितावर लक्ष ठेवून प्रत्येक देश इतर देशांच्या गतिविधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचा प्रयत्न करीत असतो.''[१] थोडक्यात परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हितासाठी प्रत्येक राष्ट्राने आखलेले व कृतीत आणलेले धोरण असते. परराष्ट्र धोरणात काळ व परिस्थितीनुसार बदल केला जातो. म्हणजे परराष्ट्र धोरण हे गतिशील असते परराष्ट्र धोरणावर भौगोलिक स्थान, इतिहास, संस्कृती, जनतेच्या आकांक्षा, लोकमत आणि नेतृत्व इ. घटकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पडत असतो व त्यातून परराष्ट्र धोरण आकारास येत असते.

**शीतयुद्धकालीन भारताचे परराष्ट्र धोरणत :-**

द्वितीय महायुद्धानंतर जगाची दोन गटात विभागणी झाली होती. एका गटाचे नेतृत्व भांडवलवादी अमेरिका करीत होता तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व साम्यवादी रशिया करीत होता. अशा परिस्थितीत स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाचे संचालन पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांनी केले. परराष्ट्र धोरण ठरविण्यात नेतृत्व हे एक प्रमुख मानवीय तत्व आहे. नेतृत्वाच्या माध्यमातून देशाच्या परराष्ट्र धोरणाला दिशा व शक्ती प्रदान केली जाते. नेतृत्व हे देशाच्या परराष्ट्रीय धोरण निर्मितीत महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची उद्दिष्टये ठरविण्यात पं. नेहरूंच्या नेतृत्वाने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यातून, विचारातून भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित असा आकार प्राप्त झाला. त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टये आणि तत्वे निर्धारित केली म्हणजे भारताच्या परराष्ट्र धोरणाचाढाचा तयार करण्यात पं. नेहरूचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. म्हणूनच त्यांना 'भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार' म्हणून संबोधले जाते.[२]

राष्ट्रीय हित, जागतिक शांतता आणि परराष्ट्र धोरणाचे स्वातंत्र्य यासाठी पं. नेहरूंनी 'अलिप्तवादी' धोरणाचा स्विकार केला. तसेच शेजारील राष्ट्रांसोबत भारताचे संबंध हे मैत्रीपूर्ण राहावेत यासाठी पं. नेहरू सातत्याने प्रयत्नशील होते. याचाच भाग म्हणजे पं. नेहरूंनी चीनशी

'पंचशील' करार केला.[३] पं. नेहरूंना याची स्पष्ट जाणीव होती की, भारताला राजकिय स्वातंत्र्य मिळाले असले तरी आर्थिक सत्ता सुत्रे ही इंग्लंडकडेच होती. तसेच लष्करीदृष्ट्या भारत इंग्लंडवरच अवलंबून होता, म्हणून पं. नेहरूंनी 'राष्ट्रकुल'चे सदस्यत्व स्विकारले. पं. नेहरू 'आशिया-आफ्रिका एकतेचे' प्रबळ समर्थक होते. त्यांच्या पुढाकारातून इ.स. १९४७ मध्ये दिल्ली येथे आशियातील देशांत एकतेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने आशिया राष्ट्राचे संमेल्लन घेण्यात आले. पं. नेहरूंनी आंतरराष्ट्रीय शांतता, निशस्त्रीकरण, परस्पर सहअस्तीत्व, संयुक्त राष्ट्रसंघाचे समर्थन इ. घटकांवर भर दिला होता. एकंदरीत आंतरराष्ट्रीय शांतता व आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधी स्वतंत्र दृष्टीकोण हे पं. नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची ठळक वैशिष्ट्ये मानले जाते.

इ. स. १९६२ साली भारत-चीन युद्धात भारताचा मानहानीकारक पराभव झाला. पं. नेहरूच्या परराष्ट्र धोरणावर टिका करण्यात येऊ लागली. पं. नेहरूंचे परराष्ट्र धोरण आदर्शवादी आणि भावनाप्रधान आहे. अलिप्तवादी धोरणामुळे भारताला एकही मित्र राष्ट्र लाभले नाही. आंतरराष्ट्रीय शांततेचे ध्येय प्राप्त करतांना पं. नेहरूनी देशाच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले. असे असले तरी पं. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे तत्कालीन जागतिक परिस्थिती आणि राष्ट्रीय हित यांत समन्वय साधणारे होते. त्यांनी घालून दिलेल्या तत्वानुसारच नंतरच्या शासकांनी परराष्ट्र धोरणाचे संचालन केले.

पं. नेहरूनंतर सत्तेवर आलेल्या इंदिरा गांधी यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचे यशस्वी संचालन केले. इंदिरा गांधीच्या परराष्ट्र धोरणाची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला व अलिप्तवादाला यथार्थवादाची जोड दिली. इंदिरा गांधीनी आर्थिक आत्मनिर्भरतेबरोबरच सैनिकी शक्तीला महत्व दिले. याचाच एक भाग म्हणजे १९७४ साली 'आण्विक चाचणी व १९७५ साली 'आर्यभट्ट' हा भारतीय उपग्रह अंतरिक्षात सोडून भारताला 'आण्विक शक्ती' बरोबरच 'अंतरिक्ष शक्ती' बनवले.[४] दुसरे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता भारताला एका विश्वसनीय मित्र राष्ट्राची आवश्यकता होती. इंदिरा गांधी दूरदृष्टी ठेवून इ. स. १९७१ साली सोव्हियत रशियाशी मैत्री करार केला. इ.स.१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात इंदिरा गांधी यांनी आपल्या परिपक्व नेतृत्वाचे दर्शन संपूर्ण जगाला घडविले. भारताच्या शेजारील राष्ट्रांशी मित्रत्वाचे घनिष्ठ संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एकंदरीत इंदिरा गांधीनी भारतीय परराष्ट्र धोरणाला वास्तववादाची व शक्तीसंपन्नतेची जोड देण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. इ.स. १९७७ ते १९८० या कालखंड जनता पक्षाचे सरकार सत्तेवर होते. या शासनाने शेजारील राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**शीतयुद्धोत्तर भारताचे परराष्ट्र धोरणः-**

इ.स. १९९१ च्या सोव्हियत रशियाच्या विघटनाने शीतयुद्धाची समाप्ती झाली. खाडी युद्धात विजय प्राप्त झाल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेची एकाधिकारशाही निर्माण झाली. अशा नवीन विश्वरचनेत आपले स्थान टिकविण्यासाठी आणि बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांत महत्वपूर्ण बदल घडवून आणले. २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात प्रामुख्याने पी.व्ही. नरसिंहराव, इंद्रकुमार गुजराल व अटलबिहारी वाजपेयी यांच्या धोरणाचा उल्लेख करावा लागेल. पी.व्ही. नरसिंहराव यांनी शीतयुद्धोत्तर निर्माण झालेल्या आव्हानाचा विचार करून भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांत काही बदल केले. त्यात जपान, जर्मनीसह दक्षिणपूर्व आशियातील राष्ट्रांशी आर्थिक आणि व्यापारी संबंध घनिष्ठ करण्यावर भर दिला. अमेरिकेसोबत मित्रत्व संबंध निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. थोडक्यात पी.व्ही.नरसिंहराव यांनी परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना भारताच्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करण्यावर भर दिला.[५]

इ. स. १९९७ मध्ये पंतप्रधान बनलेल्या इंद्रकुमार गुजराल यांनी आपल्या 'गुजराल सिद्धांताच्या' आधारे भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित केले आहे. तत्कालीन सी.टी.बी.टी. करारावर स्वाक्षरी करण्यासाठी भारतावर आंतरराष्ट्रीय दबाव व वाढत होता. चीन-पाकिस्तान मैत्री, सार्क सदस्य राष्ट्रांतील संघर्ष, अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही आणि पाकपुरस्कृत वाढता दहशतवाद इ. आव्हांनाचा सामना करण्यासाठी भारतीय परराष्ट्र धोरणाचे नवीन उद्दिष्ट्ये आखण्यात आली. तसेच इंद्रकुमार गुजराल यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास व परराष्ट्र धोरणातील अनुभवाच्या आधारे भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबत जे धोरण आखले. त्यालाच 'गुजराल धोरण' असेही संबोधले जाते. यात भारत-पाक संबंध सुधारण्यासाठी काश्मिर

प्रश्न (केंद्रीय मुद्दा) बाजूला ठेवून दोन्ही देशांनी द्विपक्षीय सहकार्यावर भर द्यावा. दक्षिण आशियाई पातळीवर सार्कच्या सदस्य राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आणि भारताच्या आर्थिक व्यापारी हितसंबंधाची जपवणूक इ. संबंधी विचार मांडण्याचे दिसून येते. इंद्रकुमार गुजराल यांच्या 'गुजराल धोरणामुळेच त्यांना पंडित जवाहरलाल नेहरूनंतर भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय दिले जाते.[६]

**इ.स.१९९८ व इ.स.१९९९** साली सत्तेवर आलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांच्यासमोर परराष्ट्र धोरणासंदर्भात आव्हाने होती. त्यात जम्मू-काश्मिरमधील वाढता दहशतवाद, चीन-पाकिस्तानच्या अण्वस्त्र कार्यक्रमांमुळे भारतीय सुरक्षेला निर्माण झालेला गंभीर धोका, अणुशक्ती विकासाचा कार्यक्रम थांबविण्यासाठी भारतावर वाढता आंतरराष्ट्रीय दबाव इ. आव्हानांचा प्रामुख्याने समावेश होतो. या आव्हानांचा सामाना करण्याच्या दृष्टीने श्री. वाजपेयी यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांत काही बदल केले. त्यानुसार परराष्ट्र विषयक धोरण राबविण्याचा प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय दबावाचा विचार न करता भारताच्या सुरक्षासाठी पाच अणुचाचण्या करण्यात आल्या. शेजारील राष्ट्र पाकिस्तानशी संबंध सुधारण्यासाठी 'लाहोर बस' या ऐतिहासिक यात्रेचे आयोजन करण्यात आले. मात्र पाकपुरस्कृत वाढता दहशतवाद व कारगिल युद्ध यामुळे श्री. वाजपेयी सरकारने आपल्या कुटनितीचा परिचय करून देताना पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडले.[७] अमेरिकेशी घनिष्ठ संबंध ठेवत असतानाच भारताने बहुध्रुवीय विश्वरचना निर्माण व्हावी यासाठी प्रयत्नशील होता. याचाच एक भाग म्हणून रशिया, चीन, जपान, जर्मनी, आसियान महासंघ यांसारख्या देशांबरोबर आणि व्यापारी संघटनांबरोबर आर्थिक आणि व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताने केला. त्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणासंबंधी 'पंचसूत्री' चा कार्यक्रम मांडला. या पंचसुत्री कार्यक्रमाच्या आधारे भारताच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्यात आले. डॉ. मनमोहन सिंग सरकाने अमेरिकेशी घनिष्ठ मैत्री संबंध प्रस्थापित करताना अमेरिकेकडून घनिष्ठ संरक्षण सहकार्याचा दर्जा प्राप्त करून घेण्यात यश मिळविले.

इ.स. २०१४ मध्ये केंद्रात बहुमताने सत्तेवर आलेल्या 'मोदी सरकार' समोर परराष्ट्र संबंध या क्षेत्रात विविध आव्हाने होते. यात प्रामुख्याने चीनची वाढती आक्रमकता विस्तारवादी धोरण, पाकपुरस्कृत दहशतवाद तर दुसरीकडे अमेरिका व युरोपीयन राष्ट्रातून आर्थिक समस्यांमुळे तटस्थेची मानसिकता बळावत चालली होती. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय व विभागीय घडोमोडीवर प्रभाव टाकण्याची क्षमता विकसित करणे या धोरणाचा स्विकार केला. त्यांनी आपल्या परराष्ट्र धोरण विकासाच्या पहिल्या टप्प्यात द. आशियातील शेजारी देशाशी घनिष्ठ संबंध निर्माण करण्यावर भर दिला. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात त्यांनी उत्तर पूर्व आशिया व दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे आणि तिसऱ्या टप्प्यात अमेरिकासारख्या विकसित राष्ट्रांशी संबंध विकसित करण्याचे ठरविले. नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र धोरण 'फास्ट ट्रॅक डिप्लोमसी' म्हणतात.[८] एकंदरीत नरेंद्र मोदी यांनी परराष्ट्र धोरणात आर्थिक विकासाला प्राधान्य दिले आहे. भारतातील साधन संपत्तीच्या विकासाठी परकिय गुंतवणूक आकर्षित करणे हे मोदीच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट आहे. तसेच भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेशीसंबंधी हितसंबंधाचे रक्षण करणे यासाठी कोणतीही तडजोड न करणे या धोरणाचा स्विकार केल्याचे दिसून येते.

**भारताच्यापरराष्ट्र धोरणांसमोरील आव्हाने :-**

भारताच्या भूतकालीन, वर्तमानकालीन परराष्ट्र धोरणाचा आढावा घेतला तर भविष्यकालीन भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर कोणते आव्हाने आहेत याचा विचार करता येतो. पं. नेहरूपासून ते नरेंद्र मोदी यांच्यापर्यंतच्या पंतप्रधानासमोर आंतरराष्ट्रीय विभागीय आणि शेजारील देशाचे किंवा बदलत्या परिस्थितीचे आव्हान राहिले आहे.

भारताच्या परराष्ट्र धोरणाला चीनची वाढती आक्रमकता ही समस्या भविष्यात भेडसावणारी आहे.[९] चीनने आपल्या लष्करी आधुनिकीकरणाचा सपाटा लावला आहे. परिणामी चीन संरक्षणावरील खर्च सातत्याने वाढवित आहे. तसेच आशिया खंडातील चीनचे वाढते विस्तारवादी आणि हस्तक्षेपी धोरण भारतीय परराष्ट्र आणि संरक्षण धोरणांपुढील मोठे आव्हान आहे. चीनच्या या विस्तारवादी धोरणांमुळे चीनने भारताच्या सरहद्दीत सातत्यानेघुसखोरी केली आहे. अलिकडे निर्माण झालेली डोकलामची समस्या ही त्याचे उत्तम उदाहरण आहे. तसेच मागील काही

वर्षांपासून चीन अतिशय विचारपूर्वक भारताच्या शेजारील राष्ट्रांसोबत आर्थिक व संरक्षणविषयक संबंध प्रस्थापित करून भारताला सामारिकदृष्ट्या घेरण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारतासमोरील काश्मिर समस्या व पाकपुरस्कृत दहशतवाद ही कायमची डोकदुखी ठरली आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रबिंदू हा भारताचा विरोध हाच राहिला आहे. त्यासाठी वेळोवेळी पाकिस्तानकडून काश्मिरचा मुद्दा उचलला जातो. काश्मिरचा मुद्दा हा भारतासमोरील एक महत्वपूर्ण आव्हान आहे. आतापर्यंत ही समस्या सोडविण्यासाठी पाकिस्तानकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. कारण पाकिस्तानमध्ये स्वातंत्र्योत्तर ७१ वर्षांपैकी ३१ वर्ष लष्करांची सत्ता होती.[१०] काही नागरी सरकारे सत्तेवर आली पण ते जास्त काळ टिकली नाहीत आणि जी सरकारे टिकली त्यास लष्करांची मर्जी संपादन करावी लागली. एकंदरीत काश्मिर समस्या व पाकपुरस्कृत दहशतवादावर तोडगा काढणे हे एक भारतीय परराष्ट्र धोरणांसमोरील आव्हान ठरते.

भारताचे दक्षिण आशियात अतिशय महत्वाचे स्थान आहे. दक्षिण आशियाला भारताचे प्रभावक्षेत्र म्हटले जाते. अलिकडे या दक्षिण आशियातील मालदीव, भूतान व म्यानमार या राष्ट्रांसोबत असलेल्या भारताच्या मैत्रीपूर्ण संबंधाला तडा जाताना दिसतो आहे.[११] हिंदी महासागराच्या दृष्टीने मालदिवचे स्थान अतिशय महत्वपूर्ण मानले जाते. मालदीवमध्ये चीनची आर्थिक व राजकिय गुंतवणूक क्रमाने वाढत आहे. हे भारतासाठी त्रासदायक ठरू शकते. डोकलामच्या प्रश्नांवरून भूतानमध्ये भारताविषयी संशय निर्माण करण्यात चीन यशस्वी होताना दिसत आहे. तेव्हा भारताने वेळीच याची दखल घेणे आवश्यक आहे. एकंदीत दक्षिण आशियातील भारताच्या प्रभावक्षेत्राला तडा जाणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाण ठरू शकते.

शीतयुद्धोत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणातील महत्वपूर्ण परिवर्तन म्हणजे आर्थिक व व्यापारी हितसंबंधाच्या संरक्षणाला प्राधान्य दिले आहे. यासाठी अमेरिका, जपान, रशिया, चीन यासारख्या विकसित राष्ट्रांशी आर्थिक व्यापारी करार केले जात आहेत. हे करार करतांना तत्कालीन सरकारनी भारताच्या संरक्षणाशी कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही. मात्र विकसित राष्ट्राशी आर्थिक व व्यापारी करार करतांना अधिकाधिक फायदा मिळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. उदा. नुकतीच दिल्ली येथे भारत-अमेरिका या दोन देशाची परिषद घेण्यात आली. या परिषदेत उभय देशात आधुनिक दळणवळणाच्या संदर्भात महत्वपूर्ण करार झाला. परंतू भारताला अमेरिकी बाजारपेठेसाठी विशेष दर्जा मिळणे अपेक्षित होते तो मिळाला नाही.[१२]

वरीलप्रमाणे 'भारताचे परराष्ट्र धोरण : काल आज आणि उद्या' अशा संक्षिप्त आढावा घेतला तर असे लक्षात येते की, पं. नेहरूपासून ते नरेंद्र मोदी यांच्यापर्यंतच्या पंतप्रधानांना भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करताना विविध समस्यांचा विचार करावा लागला. देशाचे पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांच्यासमोर स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करणे, तत्कालीन दोन्ही महासत्तांच्या गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहतांना आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली स्वतंत्र प्रतिमा करणे अशी आव्हाने होती. तर श्रीमती इंदिरा गांधीसमोर 'अमेरिका-चीन-पाकिस्तान' या तीन राष्ट्रांच्या मैत्री संघाच्या रूपाने आव्हाने होती. राजीव गांधी यांच्यासमोर श्रीलंकेतील अशांतता ही समस्या होती. त्यानंतर शीतयुद्धोत्तर काळात सत्तेवर आलेल्या शासकांसमोर नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेशी जुळवून घेण्याचे आव्हान होते. तर भविष्यकाळात पाकिस्तान, चीन बरोबरच संयुक्त राष्ट्र स्थायी सदस्यत्व, बहुध्रुवीय व्यवस्था आदी आव्हानाची विचार करावा लागणार आहे.थोडक्यात भारतीय परराष्ट्र धोरणाचा विचार करता, भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर शेजारील राष्ट्रे, विभागीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारण वेग-वेगळ्या आव्हानाच्या स्वरूपात आले आहे.

**संदर्भग्रंथ**

१. व्ही.एन.खन्ना एवं लिपाक्षी आरोडा- भारत की विदेशी निती, विकास पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली, पृष्ठ क्र. १
२. K.P. Karunakaran- The Phenonenon of Nehru
३. सुभाष काश्यप- जवाहरलाल नेहरू : जीवन, कृती एवंम कृतिव, एसचंद एण्ड कंपनी लि. पृष्ठ क्र. ६६
४. बी. सिंह गहलौत- भारतीय विदेशी निती, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली पृ. क्र ६४

५. राजबाला सिंह–भारत की विदेश निती, आविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स जयपूर, पृ. क्र ६७
६. शैलेंद्र देवळाणकर– भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन पुणे, पृ. क्र ८५
७. बी.एल.फडिया– आंतरराष्ट्रीय राजनितीः सिद्धात एवं समकालीन राजनितिक मुद्दे, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा, पृ. क्र २४४
८. शैलेंद्र देवळाणकर– भारत आणि जग : भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षांसबंध सकाळ प्रकाशन पुणे, पृ. क्र २५
९. शैलेंद्र देवळाणकर–समकालीन जागतिक राजकारण : विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, पृ. क्र ३०
१०. दैनिक लोकसत्ता दिनांक २३ ऑगस्ट २०१८
११. दैनिक लोकसत्ता दिनांक ०७ ऑगस्ट २०१८
१२. दैनिक लोकसत्ता दिनांक १०सप्टेंबर २०१८